# १६. सण – आनंदाचा क्षण

• चित्र पाहा. वर्णन करा.





## स्वाध्याय

- तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे करतात ? तुम्हांला कोणता सण जास्त आवडतो ? त्या सणाचे वर्णन करा. **वर्णनासाठी प्रश्न –** सणाचे नाव काय ? यावर्षी तो कोणत्या महिन्यात आहे ? त्या सणाची तयारी घरात कशी करतात ? कोण काय काय करते ? या सणाला तुमच्या घरी कोण कोण येते ? तुम्हांला हा सण का आवडतो ? वर्णन लिहा व वर्गात वाचून दाखवा.
- वर्गमित्रांकडून त्यांच्या घरी साजऱ्या केलेल्या सणाचे रीतिरिवाज माहीत करून घ्या.
- ईद, नाताळ असे विविध सण कसे साजरे करतात याची माहिती मिळवा. वहीत लिहा.

## आम्ही असेही बोलतो

- **वाचा.**

१. ''वर्षा, कुठे आहेस गं **तू** ?'' दादाचा आवाज आला. ''इथेच'' वर्षा म्हणाली. ''इथेच कुठे ? दिसत तर नाहीस.'' दादा तिला शोधू लागला. ''अरे, इकडे वर बघ. **मी** झाडावर बसलेय.'' वर्षा दादाला बोलवू लागली.

२. चेतन दुकानात गेला. सोबत सोमू होता. चेतन दुकानातल्या काकूंना म्हणाला, ''काकू, **तुम्ही** चिंचेच्या गोळ्या ठेवता ?'' दुकानदार काकू म्हणाल्या, ''आहेत की. किती देऊ ?''
''सहा दया.'' चेतन म्हणाला. ''**मी** टेकडीवर पळत जाण्याची शर्यत जिंकलो म्हणून मला तीन गोळ्या. हा सोमू दुसरा आला म्हणून याला दोन गोळ्या. **आम्ही** दोघं मिळून पाच गोळ्या घेणार आणि **तो** राजू आहे ना, तो तिसरा आला म्हणून त्याला फक्त एक गोळी.''
''काय तुम्ही मुलं ? टेकडीवर पळण्याची शर्यत काय लावता ? अरे, शर्यत लावण्यापेक्षा तुम्ही सगळ्यांनी तर रोजच पळत टेकडीवर जायला पाहिजे.'' गोळ्या देता देता काकू म्हणाल्या.

वरील दोन्ही प्रसंग नीट वाचा. दादा वर्षाला बोलावताना, 'कुठे आहेस गं **तू** ?' असे म्हणाला. वर्षा मात्र स्वत:विषयी बोलताना, '**मी** झाडावर बसलेय' असे म्हणाली.

दुसऱ्या प्रसंगात चेतन काकूंना '**तुम्ही**' म्हणाला. राजूविषयी बोलताना '**तो**' असं म्हणाला. स्वत:विषयी बोलताना मात्र चेतनने '**मी**' हा शब्द वापरला. तो आणि सोमूविषयी एकत्र बोलताना '**आम्ही**' हा शब्द वापरला.

मराठी बोलताना आपण जेव्हा स्वत:विषयी बोलतो तेव्हा '**मी**' असा शब्द वापरतो. आपल्यासह इतर काहीजणांबद्दल बोलायचे असेल, तर '**आम्ही**' हा शब्द वापरतो. आपल्या मित्रमैत्रिणींशी बोलताना '**तू**', '**तुम्ही**' असे शब्द वापरले जातात. रिक्षावालेकाका, शिक्षक, मित्रमैत्रिणींचे आईबाबा अशा लोकांविषयी बोलताना '**ते**', '**त्या**' असे शब्द वापरतो.

### स्वाध्याय

- **खालील लोकांशी/लोकांविषयी बोलताना तुम्ही कोणते शब्द वापराल ते विचार करून लिहा.**

| व्यक्ती | व्यक्तीशी बोलताना | व्यक्तीविषयी बोलताना |
|---|---|---|
| आई | तू, तुला, तुझी ...... | तिला, तिने ....... |
| बाबा | | |
| शिक्षक | | |
| मैत्रिणीची आजी | | |
| शाळेतील शिपाई | | |